# विशेष संपादकीय

## का रे दुरावा : महापालिकेच्या रंगमंचावर

**नगरपालिका निवडणुका सुरु आहेत; व्यासपीठावर नेता तुळशीपत्रासारखा उभा आहे, वरून देवदर्शन, आतून राजकीय धुरळा. घोषणा, घोषवाक्ये, रंगीबेरंगी बॅनर— सगळे लोकशाहीचे दृष्य दाखवतात. मात्र, पडद्यामागे चालणारी कसरत, युक्ती आणि धूर्तपणा ही खरी रंगभूमी आहे. शहरातल्या प्रत्येक वॉर्डमधील गणित, मतदारांची आकडेवारी, पक्षांची रणनीती—ही महापालिकेच्या लढाईची खरी कथा आहे..**

महापालिकेच्या राजकारणाला 'वरून कीर्तन, आतून तमाशा'या पुरेपूर अर्थाचा अनुभव येतो. प्रत्येक पार्टी व्यासपीठावर हातात हात घालून दिसते; प्रत्यक्षात वॉर्डच्या गल्ल्यांमध्ये मतदारांशी वागणूक, गणित आणि स्पर्धा यांचा धुरळा उडतो आहे. ही लढाई केवळ जागा जिंकण्याची नसून सत्ता टिकवण्याची आणि मनाची गळचट पुसण्याची आहे. महायुतीत 'डबल इंजिन, ट्रिपल इंजिन'असले, तरी शहराचा प्रत्येक वॉर्ड हा स्वतंत्र लढाईचं मैदान आहे. वरून आघाडी एकत्र दिसते; पण मतदारांच्या तिकिटांवर, सीटवर आणि वार्डनिहाय आकडेवारीवर प्रत्येक घटक पक्ष आपापली फळेबाजरी करत असतो. एकजूट जाहीर आहे; आतून प्रत्येक नेता आपापल्या गटासाठी दगड उधळतो. महाविकास आघाडीही काही कमी नाही. 'सत्तेची गरज' म्हणून एकत्र आलेली ही आघाडी प्रत्यक्षात 'कोण जास्त धैर्यवान, कोण जास्त धूर्त' याची परीक्षा आहे. घोषणांमध्ये मोठी एकजूट, प्रत्यक्षात वाटाड्यांसारखी चाल—मतदार आणि कार्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्याची स्पर्धा. वरून मंचावर हस्ते मिळवतात, आतून गणिताचा तूटका करत असतात. शहराची प्रत्येक वॉर्ड निवडणुकीसाठी रणभूमी बनते. गल्ल्यांमध्ये पोस्टर, बॅनर, प्रचार मोहीम—हे सर्व वरून रंगीत शोभेचे आहे; पडद्यामागे प्रत्येकीच्या गटाचे टॅक्टिक, मतदारांची यादी, संख्याशास्त्र यांचा 'बोचरी रासायनिक प्रयोग' सुरू असतो. शहरातील प्रत्येक निवडणूक ही राजकारणाचा प्रयोगशाळा आहे—वरून सुरेख, आतून विस्फोटकच आहे. इतिहास आपल्याला वारंवार शिकवतो. १९९० च्या दशकातील महापालिका निवडणुका, २०१०–२०१५ च्या आघाड्या— वरून एकत्र, आतून कलह. एकच उदाहरण आहे जे दाखवते की, मतदारांच्या निर्णयावर या 'तमाश्याचा रंग' कसा परिणाम करतो: जेथे बाह्य रूप एकजूट दाखवते, तेथे अंतर्गत संघर्ष मतदारांच्या अपेक्षांवर थेट परिणाम करतो. महापालिकेतील निवडणूक ही ही फक्त सत्ता जिंकण्याची लढाई नाही; ती मनोवैज्ञानिक रणसंग्राम आहे. मतदारांकडून स्वीकृती मिळवण्याची लढाई, कार्यकर्त्यांमध्ये अंतर्गत दबाव आणि गटबाजी या सगळ्यांचा संगम पाहायला मिळतो. वरून घोषणा, भाषण, कीर्तन; आतून बोचरी गणित आणि तमाशा—हीच खरी कथा आहे. मतदारही सजग झाले आहेत. व्यासपीठावरचा कीर्तन पाहून ते विस्मयचकित होतात; पण गल्ल्यांमधील घटना, घोषणांची खरी अंमलबजावणी, वचनांची पूर्तता यावरून विचार करतात. राजकारण्यांची झिंग उतरली की, त्यांच्यावरील विश्वास किंवा अस्वीकृती लगेच दिसते. ही जनता फक्त निरीक्षक नाही; ती परीक्षक आहे. शेवटी प्रश्न उरतो तोच: या महापालिकेच्या रंगभूमीवर वरून कीर्तन चालू असताना, आतून तमाशा किती दिवस टिकेल? आघाड्यांतील अंतर्गत संघर्ष किती दिवस लोकशाहीच्या दृश्यापासून लपेल? आणि सर्वात महत्त्वाचे—मतदार हे तमाशे पाहून केवळ मनोरंजन घेतील की निर्णयही देतील?

**- संपादक, दै. राज्य लोकतंत्र, पुणे**

# का रे महाराष्ट्र? शिक्षणाचे धोरण 100 वर्षे मागे नेणार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे : तीन वर्षांपूर्वी नवीन अभ्यासक्रम लागू झाला, पण विद्यापीठालाच काय शिकवायचे हे स्पष्ट नाही. वर्गखोल्यांमध्ये गोंधळ, विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम, शिक्षकांमध्ये हताशा—हे दुष्परिणाम लगेच दिसून येत आहेत. अनुदानित शिक्षण बंद करून, खासगीकरणाच्या दिशेने राज्यकर्ते प्रयत्न करत आहेत; हा प्रयोग यशस्वी झाला, तर गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे जवळपास अशक्य होईल. शिक्षणधोरण २०२० हे फक्त शैक्षणिक सुधारणा नाहीत, तर केंद्र-राज्य संबंधांची नवी परीक्षा आहेत. प्रश्न फक्त शिक्षणाचा नाही; अधिकारांचा आहे.?**

भारतीय राज्यघटनेने शिक्षण समवर्ती सूचीतील विषय ठेवला, यामागे स्पष्ट तर्क होता. केंद्र व्यापक दिशा देईल; अंमलबजावणीत राज्यांना स्वातंत्र्य राहील, विविध भाषा, सामाजिक रचना, आर्थिक वास्तव यांचा विचार केला जाईल. NEP 2020 मात्र या तत्त्वाशी संघर्ष करताना दिसते. धोरण जाहीर करताना 'राज्यांशी सल्लामसलत' झाली असे सांगितले जाते. प्रत्यक्षात अनेक राज्य सरकारांचा आक्षेप आजही कायम आहे—धोरणावर चर्चा झाली, पण निर्णय केंद्राने एकतर्फी घेतले. अंमलबजावणीचे ओझे पूर्णपणे राज्यांवर टाकले गेले. निधी, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा—या सर्व बाबतीत केंद्राची स्पष्ट भूमिका नाही. ५+३+३+४ ही नवीन शिक्षणरचना हे ठळक उदाहरण आहे. अभ्यासक्रम, शिक्षक प्रशिक्षण, पाठ्यपुस्तके—या सगळ्यात बदल करणे ही राज्यांची जबाबदारी. मात्र त्यासाठी लागणारा निधी, वेळ आणि प्रशासकीय क्षमता याचा विचार धोरणात नाही. केंद्र धोरण आखते; राज्ये अंमलबजावणी करताना अडखळतात; दोष मात्र राज्यांच्या माथी फोडला जातो—हा परिचित राजकीय पॅटर्न इथेही दिसतो. भाषा,संस्कृती आणि संवेदनशीलता भाषेचा मुद्दा हा केंद्र–राज्य संघर्षाचा सर्वात संवेदनशील भाग आहे. मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह वरवर शैक्षणिक वाटतो; प्रत्यक्षात तो सांस्कृतिक आणि राजकीय आहे. हिंदीपट्ट्यातील राज्यांसाठी हा आग्रह स्वीकारार्ह; बहुभाषिक राज्यांसाठी गुंतागुंतीचा. भाषा हा राज्यांचा अधिकारक्षेत्रातील विषय असताना, केंद्राकडून सूचक दिशा देणे संघराज्य तत्त्वाला छेद देणारे ठरते. उच्च शिक्षण आणि केंद्रीकरण उच्च शिक्षणात केंद्राचा हस्तक्षेप अधिक ठळक आहे. NEP 2020 अंतर्गत नियामक संस्थांची पुनर्रचना, 'एक छत्री' नियमन, राष्ट्रीय स्तरावरील मानके—हे निर्णय राज्य विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर मर्यादा आणणारे आहेत. राज्यांनी चालवलेली विद्यापीठे, महाविद्यालये यांच्यावर केंद्रनिर्धारित चौकटी लादल्या जात आहेत. विद्यापीठालाही स्पष्ट नाही की नवीन अभ्यासक्रमात काय समाविष्ट करायचे. या अस्पष्टतेमुळे शिक्षक, विद्यार्थी, प्रशासक सर्व गोंधळात आहेत. NEP 2020 अंमलबजावणीत सतत गोंधळ निर्माण होत आहे; दुष्परिणाम लगेच दिसून येतात. शिक्षणाचे खासगीकरण: गरीबांसाठी धोका अनुदानित शिक्षण बंद करून, खासगीकरणाच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. हा धोका महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणासाठी गंभीर आहे. खासगीकरण यशस्वी झाले, तर गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे कठीण होईल. सरकारी अनुदानित महाविद्यालयांची जागा भरून खासगी संस्था आल्यानंतर शुल्कवाढ, प्रवेशाची असमानता, आणि सामाजिक विषमता वाढेल. निधी आणि मनुष्यबळ शिक्षणासाठी जीडीपीच्या सहा टक्के खर्चाचे आश्वासन दिले जात आहे; पण प्रत्यक्षात खर्च वाढलेला नाही. राज्यांच्या महसुली मर्यादा आधीच अरुंद आहेत; जीएसटीसारख्या व्यवस्थेमुळे आर्थिक स्वातंत्र्य कमी झाले आहे. नवीन संदर्भ लक्षात घेतल्यास, एनईपी 2020 अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य दोघांनाही भरघोस निधी, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. अन्यथा धोरण फक्त दूरच्या डोंगरावरील हिरवळीप्रमाणे दिसेल; जवळ गेल्यानंतर काटेरी झुडपाचे हास्यचित्र ठरेल. डिजिटल शिक्षण: केंद्रीकरणाचा फायदा डिजिटल शिक्षणाचा आग्रह केंद्रासाठी नियंत्रणाचे साधन ठरू शकतो. ऑनलाइन प्लॅटफॉर्म, अभ्यासक्रम, सामग्री आणि मूल्यमापन यावर केंद्रीकृत पकड निर्माण होते. राज्यांच्या स्थानिक गरजा, भाषा, सामाजिक संदर्भ यांना दुय्यम स्थान मिळते. शिक्षकांची भूमिका आणि स्वायत्तता शिक्षक भरती आणि सेवा-सुरक्षेचा मुद्दा थेट राज्यांच्या अधिकारात येतो. NEP 2020 मध्ये शिक्षकांच्या भूमिकेबाबत केंद्रस्तरीय चौकटी दिल्या जातात. कामगिरी-आधारित मूल्यमापन, प्रशिक्षणाचे केंद्रीकरण—यामुळे राज्यांच्या प्रशासकीय स्वायत्ततेवर अप्रत्यक्ष मर्यादा येतात. शिक्षक हा राज्याचा कर्मचारी असताना, धोरणात्मक दिशा केंद्राकडून येते—हा विसंवाद अपरिहार्य ठरतो. NEP 2020 आणि संघराज्याची कसोटी महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, शिक्षणधोरण विद्यार्थ्यांसाठी आहे की सत्ताकेंद्र मजबूत करण्यासाठी? जोपर्यंत केंद्र आणि राज्ये समान भागीदारीत, विश्वासाच्या आधारे शिक्षण सुधारण्याचा प्रयत्न करत नाहीत, तोपर्यंत कोणतेही धोरण यशस्वी होणार नाही. शिक्षणधोरण आणि अंमलबजावणी ही संघराज्याची कसोटी आहे. शिक्षणासाठी निधी, मनुष्यबळ, स्वायत्तता आणि स्थानिक गरजांचा योग्य समतोल साधला नाही, तर NEP 2020 महाराष्ट्राच्या शिक्षणाला १०० वर्षे मागे नेत असल्याचे परिणाम दिसून येतील. वर्गखोल्या बदलल्या नाहीत; धोरण बदलते, पण त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होत नाही.

### केंद्र आघाडीचा प्रयोग महाराष्ट्रासाठी संकट

शिक्षणधोरण सुधारणा म्हणून मांडले जात असले, तरी याचे परिणाम राजकीय आणि सामाजिक आहेत. NEP 2020 या केंद्र-आघाडीचा प्रयोग महाराष्ट्रासाठी संकटाचे शैक्षणिक दर्शन ठरत आहे. राज्यांनी निधी, मनुष्यबळ, स्थानिक भाषा, सांस्कृतिक विविधता यांना योग्य प्राथमिकता दिली नाही; केंद्राचे एकतर्फी आदेश आणि केंद्रीकरण यामुळे धोरण अपयशी ठरू शकते. विद्यार्थ्यांचे भविष्य फक्त घोषणांवर अवलंबून राहणार नाही; प्रत्यक्ष अंमलबजावणी, बजेट, शिक्षकांची तयारी आणि राज्य–केंद्र सहकार्य हाच निर्धारक ठरेल. जर NEP 2020 यशस्वी झाला नाही, तर महाराष्ट्रातील गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हक्क दूर जातील. शिक्षण बदलते, धोरण बदलते, पण वर्गखोल्या मात्र तसेच राहतात—हा वास्तवदर्शी निष्कर्ष महाराष्ट्राला धसका देतो.

# महानगरपालिकेचा मेगा प्लॅन तयार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे : आगामी महापालिका निवडणुकीसाठी महापालिका प्रशासनाकडून अखेर निवडणूक मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, शहरात ३५ लाख ५१ हजार ९५४ मतदारांसाठी ९१८ विविध ठिकाणी तब्बल ४ हजार ४ मतदान केंद्रे असणार आहेत. त्यात, शाळा, महाविद्यालये, सोसायट्या तसेच सार्वजनिक इमारतींचा समावेश आहे. प्रत्येक प्रभागातील लोकसंख्या, मतदारांची संख्या आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन मतदान केंद्रांची आखणी करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक अधिकारी प्रसाद काटकर यांनी दिली. पुणे महापालिकेसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी व अंतिम निकाल जाहीर होणार आहेत. महापालिकेच्या निवडणूक विभागाने मतदार यादी अंतिम केली आहे. निवडणुकीदरम्यान मतदान प्रक्रिया सुलभ व अडथळामुक्त राहावी, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला मतदारांना मतदान करताना अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रवेशासाठी रॅम्पची व्यवस्था, व्हीलचेअरची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ शौचालये तसेच मतदारांना मार्गदर्शन करणारे स्पष्ट दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. तसेच, मतदान केंद्रांवर होणारी गर्दी नियंत्रित ठेवण्यासाठी आणि मतदान प्रक्रिया वेळेत पूर्ण होण्यासाठी पुरेशा प्रमाणात मतदान अधिकारी व कर्मचारी नेमण्यात येणार आहेत.

**+ प्रसाद काटकर - ९१८ ठिकाणे आणि ४ हजार ४ केंद्रे**

# पर्यटननगरी लोणावळ्यात राष्ट्रवादीची एकहाती सत्ता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** लोणावळा नगरपरिषद निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने एकहाती सत्ता मिळवली आहे. नगराध्यक्षपदी राजेंद्र सोनवणे विजयी झाले. २७ पैकी १६ जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार निवडून आले, तर मागील वेळी सत्तेत असलेल्या भाजपला फक्त चार जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसच्या तीन, शिवसेना (ठाकरे)च्या एक आणि अपक्ष तीन उमेदवारांची निवड झाली.

निवडणुकीत सोनवणे यांनी १९,५२९मते मिळवत भाजपचे गिरीश कांबळे यांचा १०,६८१ मतांनी पराभव केला. भाजपच्या माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव आणि त्यांच्या मुली अश्विनी जाधव यांनाही पराभवाचा सामना करावा लागला.

माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, सुरेखा जाधव आणि सूर्यकांत वाघमारे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. मात्र निकालात भाजपचे बालेकिल्ले ढासळले. विकासकामांवरील आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीने विजय मिळवला.

# पोस्टर समाजमन बदलण्याचे प्रभावी साधन : प्रा. उर्मिला पाटील



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पर्यावरण संवर्धन हे आजच्या काळातील महत्त्वाचे आव्हान असून विद्यार्थिनींच्या माध्यमातून जनजागृती व्यापकपणे पोहोचू शकते. "पोस्टर ही केवळ कला नसून समाजमन बदलण्याचे प्रभावी साधन आहे. पर्यावरणासह राहण्याची गरज समजावून देण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी भूमिका आहे," असे मत चंद्रभागा बाबुराव तुपे साधना कन्या विद्यालयाच्या प्राचार्या उर्मिला पाटील यांनी व्यक्त केले.

हडपसर येथील विद्यालयात आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत पाचवी इ वर्गातील विद्यार्थिनींनी पर्यावरण विषयावर पोस्टर प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाला उपमुख्याध्यापक करे आनंदराव, पर्यवेक्षिका मंदाकिनी शिंदे, तृप्ती पाटील, सर्व शिक्षकांसह सुमारे ३००० विद्यार्थिनींची उपस्थिती लाभली. घोषवाक्य, कविता, चारोळ्या आणि चित्रांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. विद्यार्थिनींनी पालेभाज्या व फळांचा वापर करून आरोग्यदायी खाद्यप्रकारही सादर केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी, पालक आणि समाजातील इतर घटकांत पर्यावरण रक्षणाची जाणीव जागृत होते, असे पाटील यांनी सांगितले. प्रदर्शनाचे नियोजन वर्गशिक्षिका अनुराधा गेजगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शुभांगी नवगण, शितल जगदाळे, सचिन खोमणे यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

**+ पर्यावरण संवर्धनासाठी साधना कन्या विद्यालयात पोस्टर प्रदर्शन**

## नवा बीएड अभ्यासक्रम पारदर्शकतेस पूरक – डॉ. पंढरी वाघमारे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : सेमिस्टर पद्धतीमुळे नियोजनबद्ध अंमलबजावणीची गरज**

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा बीएड २०२५ नवा अभ्यासक्रम शैक्षणिक प्रक्रियेत पारदर्शकता आणि जबाबदारी वाढवणारा ठरेल, असे प्रतिपादन तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. पंढरी वाघमारे यांनी केले. जेएसपीएम संचलित जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, हडपसर येथे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामदरम्यान ते प्राध्यापकांशी संवाद साधत होते. वाघमारे म्हणाले, नवीन अभ्यासक्रमानुसार प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने, निश्चित वेळेत आणि पुराव्यासह पूर्ण करावा लागणार आहे. त्यामुळे शिक्षणातील उत्तरदायित्व आणि गुणवत्ता वाढण्यास मदत होणार आहे. या शैक्षणिक वर्षापासून बीएड अभ्यासक्रम सेमिस्टर पद्धतीने राबविला जात आहे. कमी कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे, परीक्षा घेणे आणि प्रशिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये समन्वय ठेवणे ही मोठी जबाबदारी असल्याचे वाघमारे यांनी स्पष्ट केले.

## 'एडीपी'कडून माणुसकीचा हात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** सामाजिक संस्थांना अन्नधान्याचे वाटप, गरजूंना दिलासा

पुणे : सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत एडीपी कंपनीने मानवतेचा हात पुढे केला. दिवे (सासवड) येथील जीववर्धिनी मतिमंद विद्यालय, वडकी येथील गंगातारा वृद्धाश्रम तसेच हडपसर येथील कर्णबधिर विद्यालय या तीन सामाजिक संस्थांना दोन महिन्यांचा आवश्यक अन्नसाठा देऊन कंपनीने संवेदनशीलतेचे उदाहरण घातले.

विमाननगर येथील एडीपी आयटी कंपनीमार्फत गहू, तांदूळ, खाद्यतेल, डाळी आदी जीवनावश्यक अन्नधान्याचे वाटप करण्यात आले. उपक्रमात कंपनीचे कर्मचारी गणेश जगताप, सतीश पार्गे, हरीश तसेच इतर सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला.

"अशा मदतीमुळे आमच्या दैनंदिन गरजांची पूर्तता होते आणि जगण्याची उमेद वाढते," अशी भावना संस्थांच्या प्रतिनिधींनी व्यक्त करत कंपनीचे मनःपूर्वक आभार मानले. दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंना सहाय्य करणाऱ्या एडीपीने यंदाही आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. मदतीच्या माध्यमातून केवळ अन्नधान्य नव्हे, तर आपुलकी, आधार आणि माणुसकी पोहोचवल्याची भावना समाजात उमटत आहे.

# दिशाभूल करणाऱ्यांचा समाचार घेतल्याशिवाय राहणार नाही

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे कडाडल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** शिवसेनेला युतीत केवळ आठ जागा मिळणार, आणि काही कार्यकर्त्यांच्या दिशाभूलीनं वातावरण तापले; त्यामुळे जो कोणी जाणीवपूर्वक गोंधळ पसरवेल, त्याचा समाचार घेण्यात येणार आहे. पुणे शहरात राजकीय तापमान वाढले आहे, आणि कार्यालयावर शिवसैनिकांची गर्दी हे याचे थेट पुरावे आहेत, अशा कडक शब्दांत उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी समाचार घेतला. उपसभापती आणि शिवसेनेच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत सांगितले, "शिवसैनिकांना संधी मिळाली तर कोणीही संभ्रमावस्था निर्माण करू नये; महायुतीत जागा वाटपाबाबत चुकीची माहिती पसरवणाऱ्यांचा समाचार घेतल्याशिवाय राहणार नाही." भाजपा-शिवसेना युतीत शिवसेनेला केवळ आठ जागा मिळणार असल्याच्या चर्चेने काही शिवसैनिक संतप्त झाले. सकाळी रवींद्र धंगेकर यांच्या कार्यालयावर कार्यकर्त्यांची गर्दी झाली, आणि काहींनी राजीनाम्याची धमकीही दिली. "महायुतीची एकच बैठक झाली; त्यात जागा वाटपावर चर्चा झाली नाही. विनाकारक संभ्रम पसरवणाऱ्यांचा आम्ही समाचार घेणार आहोत. इच्छुक उमेदवारांची सविस्तर यादी २२ डिसेंबरपर्यंत पक्षश्रेष्ठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवली जाणार आहे. त्यानंतरच किती जागा मागणे योग्य आहे हे ठरवले जाईल." शिवसेनेतील नेते आता नाराज कार्यकर्त्यांची मनधरणी कशी हाताळणार याकडे लक्ष देत आहेत. प्रशासन आणि पक्षीय सूत्रांकडून संकेत मिळाले आहेत की, कोणत्याही प्रकारच्या गोंधळास राजकीय स्वीकृती नाही, आणि युतीत नियम आणि शिस्त पाळली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# शैलेंद्र बेल्हेकर यांचे समाजाभिमुख कार्य आदर्शवत : यादव

### व्यसनमुक्तीसाठीच्या जनजागृती उपक्रमास शौर्य समाजरत्न पुरस्कार २०२५

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे : "समाजासाठी निस्वार्थ भावना ठेवून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना पुरस्काराच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. अशा गौरवामुळे त्यांचे सामाजिक कार्य अधिक व्यापक पातळीवर पोहोचते आणि जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळते," असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष दशरथ यादव यांनी व्यक्त केले.

हडपसर परिसरात युवा पिढीसाठी व्यसनमुक्ती जनजागृती अभियान राबविणाऱ्या, तसेच विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय राहणाऱ्या कार्यकर्ते शैलेंद्र बेल्हेकर यांना शौर्य समाजरत्न पुरस्कार २०२५ प्रदान केला. हा मानाचा पुरस्कार शौर्य करिअर अकॅडमी, हडपसर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून यादवांनी बेल्हेकरांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात अकॅडमीचे संचालक हरिदास भिसे, माजी नगरसेवक सुनील बनकर, रेश्मा भिसे, दादासाहेब सोनवणे आणि आदिक ओव्हाळ आदी मान्यवर उपस्थित होते. बेल्हेकर यांनी गेल्या काही वर्षांत व्यसनाधीनतेकडे झुकणाऱ्या तरुणांच्या समस्येकडे लक्ष देत सतत जनजागृती मोहीम राबविल्या आहेत. शाळा-कॉलेजांमध्ये व्याख्याने, मार्गदर्शन शिबिरे, तसेच कलात्मक माध्यमांचा वापर करून व्यसनमुक्तीचे सकारात्मक संदेश त्यांनी पोहोचवले आहेत. यादव म्हणाले, "अनेक संस्था व कार्यकर्ते सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. पण त्यांचे कार्य समाजापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. बेल्हेकर हे तरुणांच्या आरोग्य आणि भवितव्याची काळजी घेतात, हे कौतुकास्पद आहे. अशी कार्यकर्त्यांची धडपड समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण करते."

या प्रसंगी पुरस्कार स्वीकारताना शैलेंद्र बेल्हेकर भावनिक होत म्हणाले, "व्यसनाधीनतेत सापडलेल्या कित्येक तरुणांचे भविष्य अंधारात जाताना मी पाहिले. त्या अनुभवांमुळेच समाजासाठी काहीतरी करावे, ही प्रेरणा मिळाली. आज हा पुरस्कार मला अधिक जोमाने आणि समर्पणाने काम करण्याची उर्जा देतो. हे यश माझे नाही, तर या उपक्रमास साथ देणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आहे."

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी बेल्हेकर यांच्या कार्याचा मागोवा घेत त्यांच्या पुढील योजनांची माहिती जाणून घेतली. पुढील वर्षभरात त्यांनी ग्रामीण भागात व्यसनविरोधी जनजागृती मोहीम राबविण्याची घोषणा केली.

# मद्यतस्करीवर 'सर्जिकल स्ट्राईक'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर वाढणारी अवैध मद्यतस्करी रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने पुणे जिल्ह्यात धडाकेबाज मोहिम राबवली. दोन वेगवेगळ्या ठिकाणी घातलेल्या सापळ्यात विभागाने तब्बल ४८ लाखांचा अवैध मद्यसाठा, वाहने व साहित्य जप्त करत पाच आरोपींना बेड्या ठोकल्या. १७ डिसेंबर रोजी सातारा-पुणे महामार्गावरील सारोळा (ता. भोर) येथे गोव्याहून येणाऱ्या संशयित ट्रकची झडती घेतली असता औषधांच्या बॉक्सच्या मागे लपवलेल्या १८६ विदेशी बाटल्या आढळल्या. निरीक्षक संभाजी बर्गे यांच्या पथकाने चालक संपत गावडे याला अटक केली.

दुसरी कारवाई १३ डिसेंबर रोजी उरुळी कांचन येथे करण्यात आली. पांडुरंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आलिशान कारचा पाठलाग करून १३८ गोवा बनावटीच्या बाटल्या जप्त केल्या. या कारवाईत मुख्य पुरवठादारासह तीन आरोपी पकडले गेले. दोन्ही कारवाईत एकूण ४३ लाख ५७ हजार रुपयांचा मद्यसाठा, वाहने, मोबाईलसह इतर साहित्य जप्त करण्यात आले. उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे यांनी अवैध व्यापाराविरुद्ध कारवाई आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### गुटखा वाहतुक करणाऱ्या टोळीचा पर्दापाश

**बनकरफाटा :** ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे यांना गोपनिय बामतीदारार्माफत माहिती मिळाली की, दिनांक २१/१२/२०२५ रोजी रात्रीच्या सुमारास मौजे खिरेश्वर गावच्या हद्दीत कटेनर मधील गुटखा पिकअप गाडीमध्ये भरला जाणार आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने ओतूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी तसेच खिरेश्वर गावचे पोलीसपाटील अभिजीत भौरले,खुबी गावचे पोलीस पाटीलअविनाश सुपे,ग्रामस्थ निलेश भौरले,दिपक मेमाणे यांनी माहिती मिळाले ठिकाणी जावुन खात्री केली असता दिनांक २१/१२/२०२५ रोजी ०२:००ते ०२:३० वा.चे दरम्यान कंटेनर नं. एम.एच. ०१ सी.व्ही. ९१२५ यामधील गुटखा पिकअप गाडी नं. एम.एच. १४ जी.यु. ३७८९ यामध्ये टाकत असताना १) सुरज रघुनाथ मेगळे वय- २३ वर्षे २)अतुल अनिल काळे वय-२५ वर्षे ३) माउली विठ्ठल काळे वय १८ वर्षे रा;-रोहोकल ता:-खेड जि:-पुणे हे मिळुन आले तसेच कंटेनर चालक हा अंधाराचा फायदा घेवुन त्या ठिकाणावरून पळुन जाण्यात यशस्वी झाला.

### डिझेल चोरांना पोलिसांनी पकडले

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यात शिरसगाव काटा येथे नागरिकांनी चोरट्यांना रंगेहात पकडल्याची घटना ताजी असताना आंबळे येथे रात्रगस्त करत असताना डिझेल चोरणाऱ्या परप्रांतीय चोरट्यांना शिरूर पोलिसांनी रंगेहात पकडले असून फारूक बच्चू ठेकेदार, हुकुम लक्ष्मीनारायण खाती व राजेश कैलास लोधी असे पोलिसांनी डिझेल चोरताना रंगेहात पकडून जेरबंद केलेल्या आरोपींची नावे आहे. आंबळे येथे शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार, हवालदार दिपक पवार, मनोज कुंभार हे रात्रगस्त करत असताना त्यांना हॉटेल केसरी समोर काही इसम पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या ट्रक च्या डिझेल टाकीतून डिझेल चोरत असताना त्यांना रंगेहात पकडले.

### अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांचे ईव्हीएम, मॉक पोल, सुरक्षा व मतदान व्यवस्थापनावर सखोल मार्गदर्शन

# प्रशिक्षित अधिकारी म्हणजे निवडणूक प्रक्रियेची मजबुती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया काटेकोर, पारदर्शक आणि त्रुटीविरहित पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दोन दिवसीय तांत्रिक आणि व्यावहारिक प्रशिक्षण चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात तीन सत्रांमध्ये पार पडले.

या प्रशिक्षणात मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे म्हणाले, "मतदान केंद्रांवरील अधिकारी व कर्मचारी हे निवडणूक यंत्रणेचा मेरुदंड असतात. त्यांच्या निर्णयक्षमतेवर, दक्षतेवर आणि समन्वयावर मतदान प्रक्रियेची विश्वासार्हता अवलंबून असते. त्यामुळे मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची सखोल माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे."

या प्रशिक्षणास सहआयुक्त मनोज लोणकर, उपआयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह मुख्य प्रशिक्षक नरेंद्र बंड, रामेश्वर पवार, शिवाजी लाटे, संजीव आनंदकर, किशोर शिंदे, अमोल शिंदे आणि गणेश सुर्वे उपस्थित होते. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने या प्रशिक्षणात सहभागी झाले.

बगाडे यांनी सांगितले की, मतदानाच्या दिवशी कोणतीही चूक किंवा संभ्रम निर्माण झाल्यास संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता धोक्यात येऊ शकते. त्यामुळे मतदान साहित्याची हाताळणी, मतदार यादी तपासणी, मतदानाचे रेकॉर्ड, सुरक्षा रक्षकांशी समन्वय आणि नियमांचे पालन ही प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांची मूलभूत जबाबदारी आहे.

प्रशिक्षणादरम्यान संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून संपूर्ण मतदान प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. यामध्ये ईव्हीएमची बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यांची जोडणी, कार्यपद्धती तसेच अडचणी दूर करण्याच्या पद्धतीचे प्रत्यक्ष प्रदर्शन करण्यात आले. मतदान सुरू करण्यापूर्वी करावयाच्या मॉक पोलची प्रक्रिया, त्याचे नोंदवहीतील पालन, तसेच यंत्रे सील करण्याची पद्धतही स्पष्ट करण्यात आली.

याशिवाय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना, कायदेशीर तरतुदी, टपाली मतदान, दिव्यांग मतदारांसाठी सुविधा, मतदान केंद्र व मतदान कक्ष उभारणी, मतदानाच्या आदल्या दिवशीची तयारी, मतदान दिवशी मतदान साहित्याची तपासणी, तसेच मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करावयाची अंतिम कार्यवाही अशा मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन देण्यात आले.

मुख्य प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष उदाहरणे, प्रात्यक्षिके आणि समस्या निवारणतंत्राद्वारे मतदान अधिकाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. प्रशिक्षणादरम्यान विविध परिस्थितींमध्ये घ्यावयाचे निर्णय आणि वर्तनधोरण स्पष्ट करण्यात आले. मतदान प्रक्रियेतील अचूकता, वेग, गोपनियता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी असे तांत्रिक प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत प्रमुख अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. प्रशिक्षणामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढून निवडणूक व्यवस्थापन अधिक सक्षम व सुबक होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आळंदी नगराध्यक्षपदी भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे पाटील विजयी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे पाटील यांना १२ हजार ७२४ मते मिळाली. तर राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रकाश कुऱ्हाडे पाटील यांना ६ हजार ३४ मते मिळाली. प्रशांत कुऱ्हाडे यांनी पहिल्या फेरी पासून आघाडी घेत दहाव्या फेरी अखेर ६ हजार ६९० मताधिक्याने विजय मिळवला. आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत भाजप १५ , शिवसेना ४ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे २ जागांवर उमेदवार विजयी झाले. या निकालाने आळंदी नगरपरिषदेवर भाजपची एक हाती सत्ता आल्याने भाजपने विजया नंतर जल्लोष केला. विजयी उमेदवारांनी जल्लोषात मिरवणुका काढून माऊली मंदिरात श्रींचे दर्शन घेतले. यावेळी आळंदी शहरातून फटाक्यांची आतिषबाजी, गुलाब, भंडाऱ्याची मुक्त उधळण करीत ढोल, ताशा तसेच घंटेचा ठणठणाट करीत दणक्यात उत्साही, आनंदी वातावरणात मिरवणूक काढल्या. यावेळी विजयी उमेदवारांचे समर्थकांनी जल्लोष करीत उमेदवारांचे अभिनंदन करीत विजयोत्सव साजरा केला.

नगराध्यक्ष पदाचे निवडणुकीत १९ हजार १६५ मते वैध ठरली. यात भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे पाटील बहुमत मिळवित विजयी झाले. त्यांनी पहिल्या फेरी पासून शेवटच्या दहाव्या फेरी पर्यंत सर्व मतदान केंद्रावर आघाडी घेत विजय मिळविला. आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक निर्णय अधिकारी जयराज देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी प्रभाग क्रमांक १ ते १० मधील निवडणुकीचा निकाल जाहीर केला. प्रभाग निहाय निकालांत भाजपच्या उमेदवारांनी मताधिक्याने विजय संपादन केला. प्रभाग २ (अ) मध्ये भाजपच्या वैजयंता अशोक उमरगेकर यांनी १८६२ मते मिळवत १५४८ मतांच्या आघाडी घेत नवा इतिहास रचला . नगराध्यक्ष पडण्याची परंपरा मोडीत काढत त्यांनी विजयाची परंपरा निर्माण केली. प्रभाग ५ ( ब ) भाजपच्या खुशी सागर बोरुंदिया यांनी १७०२ मते घेत १२९७ मतांची आघाडी घेतली. प्रभाग ८ ( अ ) मधून भाजपचे माजी उपनगराध्यक्ष सचिन रामदास गिलबिले ९६४ मतांच्या आघाडीने विजयी झाले. प्रभाग ७ ( ब ) मधून सुनील ज्ञानेश्वर घुंडरे ७२६ मतांनी विजयी झाले. प्रभाग ४ ( ब ) मध्ये भाजपचे गोविंदा उर्फ सागर कुऱ्हाडे ५५४ मते, प्रभाग ५ ( अ ) संतोष मारुती रासकर ५३३ मते, प्रभाग ६ ( अ ) मध्ये साक्षी अक्षय कुऱ्हाडे मते, प्रभाग ९ ( अ ) मध्ये माजी नगरसेवक दिनेश रामदास घुले ४३३ मते, प्रभाग २ ( ब ) मधून माजी उपाध्यक्ष रामचंद्र दत्तात्रय भोसले ३४९ मतांची आघाडी घेत विजय मिळवला.

प्रभाग १० ( ब ) भाजपच्या ऋतुजा अनिकेत तापकीर २३१ मतांची आघाडी घेऊन विजयी झाल्या. प्रभाग ६ ( ब ) मध्ये हेमंत गुलाबराव कुऱ्हाडे १६८ मतांची आघाडी घेऊन विजय मिळवला. प्रभाग ४ ( अ ) मध्ये कांचन किरण येळवंडे १५४ मतांची आघाडी, प्रभाग ३ ( अ ) मध्ये पूजा संजय घुंडरे ७५ मतांची आघाडी घेऊन कमी फरकाने विजय मिळवला. प्रभाग ३ ( ब ) मध्ये सोमनाथ कुंडलिक कुऱ्हाडे ५१ केवळ मतांची आघाडी घेत निसटता विजय मिळवला. प्रभाग ८ ( ब ) मध्ये भाजप उमेदवार सुजाता कालिदास तापकीर यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी जयराज देशमुख यांनी केली.

# भिमाशंकर साखर कारखान्यास "ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५" पुरस्कार



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भिमाशंकर सहकारी साखर कारखान्यास सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल "ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५" हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन, पुणे व कॉसमॉस सहकारी बँक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते हा पुरस्कार व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील व कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे यांनी स्वीकारला.

जागतिक सहकार वर्षानिमित्त करण्यात आलेल्या "सहकार मंथन २०२५" या कार्यक्रमात सहकार व्यवस्थेतील अनुभव, धोरणात्मक संकल्पना आणि सहकार मूल्यांवर चर्चा झाली. या प्रसंगी राज्य सहकारी बँकेचे प्रशासक डॉ. विद्याधर अनास्कर, राज्याचे साखर आयुक्त संजय कोलते, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कारखान्याच्या संस्थापक व माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या दूरदृष्टी नेतृत्वासह संचालक मंडळ, अधिकारी-कर्मचारी व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे हा यशश्री मिळाल्याचे कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे यांनी सांगितले. भिमाशंकर कारखान्याने आजपर्यंत राष्ट्रीय स्तरावर १३ आणि राज्य पातळीवर १७ असे एकूण ३० पुरस्कार पटकावले आहेत.

# साखरपुड्यानंतर चौथ्याच दिवशी युवकाची आत्महत्या; सणसवाडी हादरली

### विहिरीत उडी मारून जीवनयात्रेचा अंत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथे साखरपुडा होऊन अवघे चार दिवस होत असताना एका २३ वर्षीय युवकाने विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी पहाटे उघडकीस आली. रितेश बाजाबा हरगुडे (रा. सणसवाडी ता. शिरुर, जि. पुणे) असे मृत युवकाचे नाव आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रितेशचा चार दिवसांपूर्वी साखरपुडा झाला होता. शुक्रवारी पहाटे रितेश अचानक घरातून बाहेर पडला. बराच वेळ तो घरी परत न आल्याने आणि फोनही न लागल्याने संशय निर्माण झाला. कुटुंबीयांनी घरासमोरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता रितेश बाहेर जाताना दिसला. त्यानंतर कुटुंबीयांनी परिसरात शोध घेतला. दरम्यान, घरामागील विहिरीजवळ रितेशची चप्पल आणि मोबाईल फोन आढळून आला. यामुळे कुटुंबीयांनी तातडीने शिक्रापूर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अग्निशमन दलाची मदत मागवली. शुभम चौधरी, दिग्विजय नलवडे, शुभम बढे, योगेश पाटील, मयूर गोसावी, अक्षय बाबर, अभिषेक पवार, सागर जानकर, लहू मुंडे, राजेंद्र फुंदे, आपदा मित्र वैभव निकाळजे, राहुल गायकवाड यांच्या मदतीने तातडीने शोधमोहीम राबवण्यात आली. काही वेळाच्या शोधानंतर रितेशचा मृतदेह विहिरीतील पाण्यात आढळून काढण्यात आला.

या प्रकरणी रितेशचे नातेवाईक विश्वास दत्तात्रय हरगुडे (वय ४२) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची (एडीआर) नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार राकेश मळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

या दुःखद घटनेने हरगुडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नुकत्याच झालेल्या साखरपुड्यानंतर एवढ्या कमी दिवसात घडलेली ही घटना चर्चेचा विषय ठरली आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नसून तपासानंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

# मंचर नगरपंचायत : शिवसेनेच्या राजश्री गांजाळे नगराध्यक्षपदी विजयी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** प्रथमच स्थापन झालेल्या मंचर नगरपंचायत निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट)च्या राजश्री दत्तात्रय गांजाळे यांनी नगराध्यक्षपदी बहुमताचा विजय मिळवत बाजी मारली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे १७ पैकी ९ जागा जाऊनही नगराध्यक्ष पद हातातून निसटल्याने "गड आला पण सिंह गेला" अशी स्थिती निर्माण झाली.

राजश्री गांजाळे यांनी राष्ट्रवादी–भाजप युतीच्या उमेदवार मोनिका सुनील बाणखेलेंचा २१० मतांनी पराभव करत बाजी मारली. गांजाळे यांना ४१३५, बाणखेलेंना ३९२५ तर अप्रत्यक्षरीत्या लक्षवेधी ठरलेल्या अपक्ष प्राची आकाश थोरात यांना ३२२४ मते मिळाली. उबाठा गटाच्या रजनीगंधा बाणखेलेंना ७३८, काँग्रेसच्या फर्जिन मुलानी यांना ३३३ आणि अपक्ष जागृती महाजन यांना ३०१ मते मिळाली.

प्रभाग १ मधून वंदना बाणखेले या बिनविरोध निवडून आल्या. प्रभाग २, ५, ८, ११, १२, १५, १६ व १७ मध्ये राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले. शिवसेनेने (शिंदे गट) प्रभाग ३ व ४मध्ये, तर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने प्रभाग १० मध्ये विजय मिळवला.

या निवडणुकीत तीन अपक्ष उमेदवार— शिवाजी राजगुरू (प्रभाग ७), सोनाली बाणखेले (प्रभाग १४) आणि रविकिरण आवळे (प्रभाग ६) विजयी झाले. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या अंजली बाणखेले प्रभाग १३मधून निवडून आल्या. काँग्रेस व भाजपाला या निवडणुकीत मोठा धक्का बसला. भाजपाने ५ जागांवर उमेदवार दिले होते, मात्र खातेही उघडता आले नाही. काँग्रेस आणि आम आदमी पक्षालाही अत्यल्प मते मिळाली.

नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर जिल्हाप्रमुख आमदार शरद सोनवणे यांनी राजश्री गांजाळे यांचे अभिनंदन केले. यावेळी शिवसेना पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# शिक्रापुरात बिबट्याने तळ ठोकला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील शिक्रापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिक दहशतीत आहेत. कळमकरवस्ती, आनंदनगर आणि हिवरे रोड परिसरात बिबट्याच्या हालचाली वाढल्यामुळे ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने पिंजरा लावण्याची मागणी केली होती. त्यानुसार अखेर वनविभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखत पिंजरा उभारला असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. माजी उपसरपंच पूजा भुजबळ आणि ग्रामपंचायत सदस्य त्रिनयन कळमकर यांनी वनविभागाशी सातत्याने संपर्क साधून मागणी केली. वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या सूचनेनुसार वनपरिमंडळ अधिकारी गौरी हिंगणे, नियतक्षेत्र अधिकारी प्रमोद पाटील यांनी रेस्क्यू पथकासह पिंजरा उभारण्याची कार्यवाही सुरू केली. यामध्ये निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, सचिव अमर गोडांबे, सर्पमित्र गणेश टिळेकर, विशाल वायकर, आदिनाथ चव्हाण, मनोज थोरात आदींचा सहभाग होता.

# शिक्रापुरात भीषण अपघात : ट्रकची धडक, कारचा चक्काचूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र





+ देवदर्शनहून परतणाऱ्या युवकांचा मार्गात दुर्दैवी अंत; एक ठार, तिघे गंभीर जखमी

**शिक्रापूर :** (ता. शिरुर) – चाकण–शिक्रापूर मार्गावर रविवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला. देवदर्शनहून परतत असलेल्या चार युवकांच्या कारला भरधाव ट्रकने समोरून जोराची धडक दिली. या अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. कार चालक सागर दत्तात्रय थोरात (28, रा. चाकण, मूळ रा. कनोली, ता. संगमनेर, जि. अहमदनगर) यांचा जागीच मृत्यू झाला असून विनोद हावतराव खंडागळे, भागवत उत्तम पवार आणि संतोष बाळासाहेब सोनवणे हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत.

अपघात चाकणकडून येणाऱ्या एमएच 14 FC 6683 या भंगार भरलेल्या ट्रकने वेगात ओव्हरटेक करताना कारला धडक दिल्याने झाला. ही धडक इतकी भीषण होती की कारमधील सर्वजण आत अडकले. शिक्रापूर पोलीस मित्र अतुल थोरवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीच घटनास्थळी धाव घेऊन जखमींना वाहनातून बाहेर काढत जवळच्या रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी मृत सागर थोरात यांचे नातेवाईक बाळासाहेब मारुती थोरात यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीनुसार ट्रक चालक सुजित तुकाराम मासाळ (23, रा. हरगुडेवस्ती, चिखली, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उद्धव भालेराव करीत आहेत.

### कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत चमकदार यश

# नगदवाडी केंद्रशाळेचा तालुक्यात मानाचा झेंडा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ ३५६ शाळांमधील स्पर्धकांमध्ये ठसा
+ विद्यार्थ्यांचे वैयक्तिक व सांघिक कामगिरीने गावाचा गौरव
+ मान्यवरांनी केले अभिनंदन, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र वितरण



**जुन्नर :** शिक्षणासोबत कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसित व्हावे, या हेतूने आयोजित करण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत नगदवाडी जिल्हा परिषद केंद्रशाळेने उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाने शाळेचा, शिक्षकांचा आणि पालकांचा अभिमान उंचावला आहे, अशी माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली.

शिवनेरी स्कूल, खानापूर येथे झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत जुन्नर तालुक्यातील दहा शैक्षणिक बीट आणि ३२ केंद्रातील एकूण ३५६ शाळांमधील विद्यार्थी स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विविध कला, क्रीडा आणि बौद्धिक स्पर्धांमध्ये उच्च दर्जाची स्पर्धा पाहायला मिळाली.

नगदवाडी केंद्रशाळेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. रंजना रमेश चव्हाण हिने उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच ५० मीटर धावण्याच्या शर्यतीत तिने तृतीय क्रमांक मिळवत क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य सिद्ध केले. पार्थ महेंद्र काळे आणि जोया फिरोज अन्सारी या विद्यार्थ्यांनी बौद्धिक प्रश्नमंजुषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत शाळेचा नावलौकिक वाढविला. विद्यार्थ्यांच्या या यशात केंद्रशाळेतील शिक्षकांचे संयोजित व समर्पित मार्गदर्शन लाभले.

या सर्व स्पर्धकांना शाळेतील शिक्षक– मंगेश मेहेर, पंडित चौगुले, निलेश शेलार, विद्या वाघ, सुप्रिया अभंग, आशा आरेकर, उज्वला कांबळे आणि अश्विनी जगदाळे यांनी नित्य मार्गदर्शन केले. शिस्तबद्ध सराव, प्रेरणा आणि प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी साधली.

स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यासाठी गावकऱ्यांसह शैक्षणिक अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून या यशाचा आनंद व्यक्त केला. गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, शिक्षण विस्तार अधिकारी अशोक गोडसे, केंद्रप्रमुख वनिता हांडे, मुख्याध्यापिका बोऱ्हाडे यांच्यासह माजी आदर्श सरपंच बाळासाहेब बढे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, तसेच गावातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना गौरविले.

नगदवाडी सोसायटीचे चेअरमन पोपट बढे, तानाजी बढे, निलेश बढे, संगीताबाई बढे, दिपाली जाधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पालक, ग्रामस्थ आणि उत्साही विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत विजयी स्पर्धकांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या यशामुळे नगदवाडी केंद्रशाळेच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत झाला असून आगामी जिल्हास्तरीय स्पर्धांत आणखी मोठी कामगिरी करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. शिक्षणासह क्रीडा, कला आणि संस्कृतीतून विद्यार्थी घडविण्याचे व्रत संपूर्ण शिक्षकवर्गाने पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# सणसवाडीत बिबट्या संरक्षणाचे धडे




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** सणसवाडी (ता. शिरुर) येथील माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बिबट्या व सर्पांपासून संरक्षणाबाबत मार्गदर्शन करून मानव–बिबट संघर्ष टाळण्यासाठी जनजागृती करण्यात आली. जंगलालगतच्या गावांमध्ये वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्त्वाचा ठरला.

हा कार्यक्रम पोलीस पाटील दत्तात्रय माने व माजी उपसरपंच सागर दरेकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. शिरुर वन विभाग व निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या वतीने तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणे, visuals व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून सतर्क राहण्याचे धडे दिले.

यावेळी वनपरिमंडळ अधिकारी गौरी हिंगणे यांनी बिबट्या दिसल्यास शांत राहणे, गर्दी न करणे, माहिती तत्काळ वन विभागाला देणे, घर परिसर स्वच्छ ठेवणे आदी उपायांची माहिती दिली. सर्पमित्र गणेश टिळेकर, संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख व सचिव अमर गोडांबे यांनी सर्पदंश प्रतिबंध, प्राथमिक उपचार आणि तातडीच्या उपायांविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमास प्राचार्य राधिका मेंगवडे, मुख्याध्यापिका सुनिता गायकवाड, रुपाली दरेकर, मच्छिंद्र दरेकर, ममता तडवी, रागिणी सोनवणे, तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही प्रश्नोत्तर सत्रात सहभाग नोंदवत सकारात्मक प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव, मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यास हातभार लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

दैनिक राज्य लोकतंत्र

देश-विदेश

■ सोमवार,
दि. २२ डिसेंबर, २०२५



## सारांश वृत्त

### हिमाचलचे राज्यपाल तिरुपती मंदिरात

**तिरुपती** : हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांनी तिरुमला येथील भगवान वेंकटेश्वर स्वामी मंदिरात प्रार्थना केली. तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) च्या अधिकाऱ्यांनी राज्यपालांचे स्वागत केले आणि नंतर त्यांना दर्शनासाठी नेले. शिवप्रताप शुक्ल यांनी आज भगवान वेंकटेश्वराचे दर्शन घेतले. टीटीडी अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना दर्शनासाठी नेले, असे मंदिर संस्थेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

### मणिपूरमध्ये अवैध अफूची लागवड नष्ट

**इम्फाळ** : मणिपूरमधील उखरुल आणि कांगपोक्पी या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये सुरक्षा दलांनी ६०० एकरहून अधिक बेकायदेशीर अफूची लागवड नष्ट केली, असे पोलिसांनी सांगितले. याओलेन, लमलाई चिंगफेई, शोंगफेल, मुल्लम, तोराह, चांफुंग, तेइनम, फाले आणि चांगता यासह उखरुल जिल्ह्यातील विविध ठिकाणी १६-२० डिसेंबर दरम्यान सुमारे ५५९ एकर खसखसची लागवड नष्ट करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. कांगपोक्पी जिल्ह्यात सुरक्षा कर्मचाऱ्यांनी एल सिमोल, जंगनोम्फाई आणि एसपी न्गाईमुन भागात एकूण ४२ एकर अफूची लागवड नष्ट केली.

### आंध्र प्रदेशातील पल्स पोलिओ मोहीम

**अमरावती** : आंध्र प्रदेश सरकारने रविवारी राज्यभर पल्स पोलिओ कार्यक्रम राबवला, ज्यामध्ये पाच वर्षांखालील ५४ लाखांहून अधिक मुलांना जीवनरक्षक थेंब देण्यात आले. पाच वर्षांखालील सर्व मुलांना पोलिओचे थेंब पाजले जावेत याची खात्री करण्यासाठी केंद्राच्या सूचनांनुसार हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. आंध्र प्रदेश सरकारने संपूर्ण राज्यात पल्स पोलिओ कार्यक्रम राबवला, ज्यामध्ये सुमारे ३९,००० बूथवर पाच वर्षांखालील ५४ लाखांहून अधिक मुलांना पोलिओचे थेंब देण्यात आले.

### रोखे रद्द केल्यानंतरही देणग्या मोठ्या प्रमाणात

# राजकीय पक्षांना ३,८११ कोटींचा निधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना असंवैधानिक घोषित केल्यानंतर आणि रद्द केल्यानंतर पहिल्या आर्थिक वर्षात राजकीय पक्षांना मिळालेल्या देणग्यांचे चित्र समोर आले आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात नऊ निवडणूक ट्रस्टनी राजकीय पक्षांना एकूण ३,८११ कोटी रुपये देणग्या दिल्या, त्यापैकी ३,११२ कोटी रुपये एकट्या भारतीय जनता पक्षाला (भाजपा) मिळाले. हे एकूण देणग्यांच्या सुमारे ८२ टक्के आहे. निवडणूक आयोगाला सादर केलेल्या निवडणूक ट्रस्टच्या योगदानाच्या तपशीलांनुसार, काँग्रेसला फक्त २९९ कोटी रुपये मिळाले, म्हणजेच सुमारे ८%, तर इतर सर्व पक्षांना एकत्रितपणे उर्वरित ४०० कोटी रुपयांपैकी फक्त १०% मिळाले.

माध्यमातील वृत्तानुसार, २० डिसेंबरपर्यंत, निवडणूक आयोगाकडे १९ नोंदणीकृत निवडणूक ट्रस्टपैकी १३ कडून मिळालेल्या देणग्यांची माहिती होती. यापैकी नऊ ट्रस्टनी ३,८११ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्याचे नोंदवले, जे २०२३-२४ मधील १,२१८ कोटी रुपयांच्या तुलनेत २००% पेक्षा जास्त आहे. चार ट्रस्टनी (जनहित, परिवर्तन, जय हिंद आणि जय भारत) २०२४-२५ मध्ये कोणतेही देणगी दिली नाही.

प्रुडंट इलेक्टोरल ट्रस्ट भाजपला सर्वात मोठा देणगीदार म्हणून उदयास आला आहे. ट्रस्टने २०२४-२५ मध्ये एकूण २,६६८ कोटी रुपयांचे दान दिले होते, त्यापैकी २,१८०.०७ कोटी रुपये किंवा सुमारे ८२% रक्कम भाजपला मिळाली. ट्रस्टला जिंदाल स्टील अँड पॉवर, मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, भारती एअरटेल, अरबिंदो फार्मा, टोरेंट फार्मास्युटिकल्स सारख्या प्रमुख कंपन्यांकडून निधी मिळाला. तथापि, ट्रस्टने काँग्रेस, तृणमूल काँग्रेस (टीएमसी), आम आदमी पार्टी (आप), तेलुगू देसम पार्टी (टीडीपी) आणि इतर पक्षांनाही देणगी दिली.

२०२४-२५ मध्ये प्रोग्रेसिव्ह इलेक्टोरल ट्रस्टला एकूण ९१७ कोटी रुपयांचे देणगी मिळाले, त्यापैकी ९१४.९७ कोटी रुपये राजकीय पक्षांना देणगी म्हणून देण्यात आले. यापैकी ८०.८२% निधी भाजपला गेला. ट्रस्टला प्रमुख देणगीदारांमध्ये टाटा ग्रुप कंपन्या होत्या, ज्यात टाटा सन्स, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा स्टील, टाटा मोटर्स आणि टाटा पॉवर यांचा समावेश होता. २०२३-२४ मध्ये भाजपला एकूण ३,९६७.१४ कोटी रुपयांचे देणगी मिळाले, त्यापैकी १,६८५.६२ कोटी रुपये (४३%) निवडणूक रोख्यांद्वारे मिळाले. सर्वोच्च न्यायालयाने २०२४ मध्ये निवडणूक रोखे योजना असंवैधानिक घोषित केली आणि ती रद्द केली. आता, कंपन्या आणि व्यक्ती राजकीय पक्षांना चेक, डिमांड ड्राफ्ट, यूपीआय आणि बँक ट्रान्सफरद्वारे देणगी देऊ शकतात, ज्याची माहिती पक्षांनी निवडणूक आयोगाला द्यावी.

# रेल्वेची भाडेवाढः उपनगरी प्रवाशांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : रेल्वे प्रवाशांना अडचणीत आणावे लागणार आहे. भारतीय रेल्वेने भाडे रचनेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे सर्वसाधारण, स्लीपर आणि एसी वर्गातील तिकिटे महाग होतील. रेल्वेने २६ डिसेंबरपासून नवीन भाडे लागू होणार असल्याचे जाहीर केले आहे. मेल, एक्सप्रेस आणि नॉन-एसी गाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढवण्यात आले आहे. परिणामी, तुम्हाला प्रति ५०० किलोमीटरसाठी १० रुपये जास्त खर्च करावे लागतील.

या वाढीव भाड्यामुळे रेल्वेला ६०० कोटी रुपयांचा फायदा होईल असा अंदाज आहे. माहितीनुसार, २१५ किलोमीटरपेक्षा जास्त प्रवासासाठी प्रवाशांना सामान्य गाड्यांमध्ये प्रति किलोमीटर एक पैसा जास्त द्यावा लागेल. तर मेल/एक्सप्रेस, स्लीपर आणि एसी गाड्यांमध्ये २१५ किलोमीटरपेक्षा जास्त प्रवासासाठी त्यांना प्रति किलोमीटर दोन पैसे जास्त द्यावे लागतील. नॉन-एसी कोचमध्ये ५०० किलोमीटरपेक्षा जास्त प्रवासासाठी त्यांना १० रुपये जास्त द्यावे लागतील.

रेल्वेचे म्हणणे आहे की, कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना लक्षात घेऊन उपनगरी ट्रेनचे भाडे वाढवलेले नाही. गेल्या १० वर्षात गाड्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. सुरक्षितता आणि सुरळीत कामकाजासाठी अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. परिणामी, रेल्वेवरील भारही वाढला आहे, असेही रेल्वेने म्हटले आहे.

# भाजप नेत्यांवर हल्ल्याची योजना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टात राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) आणि संघटनेच्या २० नेत्यांविरुद्ध दाखल केलेल्या आरोपांवर युक्तिवाद ऐकला. एनआयएने कोर्टाला सांगितले की पीएफआय भाजप आणि आरएसएस नेत्यांवर हल्ल्यांची योजना आखत आहे. केंद्र सरकारने २०२२ मध्ये पीएफआयवर बंदी घातली.

एनआयएचे विशेष न्यायाधीश प्रशांत शर्मा यांच्यासमोर झालेल्या युक्तिवादात केंद्रीय तपास यंत्रणेने म्हटले की, काही भाजप आणि आरएसएस नेते पीएफआयचे लक्ष्य होते. एनआयएच्या वतीने विशेष सरकारी वकील (एसपीपी) राहुल त्यागी यांनी सादर केलेले युक्तिवाद न्यायालयाने ऐकले. आरोपींचे युक्तिवाद ऐकण्यासाठी न्यायालयाने पुढील सुनावणी २३ डिसेंबर रोजी ठेवली आहे. एनआयएने म्हटले आहे की पीएफआय तरुणांना इतर धर्मांविरुद्ध कट्टरपंथी बनवत आहे. काही भाजप आणि आरएसएस नेते पीएफआयच्या लक्ष्यात होते. एनआयएचे वकील राहुल त्यागी यांनी असेही म्हटले की पीएफआय शरिया कायद्यावर आधारित खलिफाट स्थापन करण्यासाठी काम करत आहे.

२०२२ मध्ये, देशव्यापी कारवाई दरम्यान, एनआयएने विविध ठिकाणांहून अनेक पीएफआय नेत्यांना अटक केली. त्यानंतर, केंद्र सरकारने पीएफआयला बंदी घातलेली संघटना घोषित केली. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पीएफआय नेत्यांसह इतरांविरुद्ध मनी लॉँड्रिंगचा खटलाही दाखल केला.

### कार्यकारी अध्यक्षांच्या निवडीनंतर चर्चेला वेग

# भाजपमध्ये संघटनात्मक फेरबदलांचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय जनता पक्षाने नितीन नवीन यांची कार्यवाहक राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड केल्यानंतर पक्षात संघटनात्मक फेरबदलांच्या चर्चेला वेग आला आहे. येत्या काळात ते भाजपची सूत्रे सांभाळणार असून, पुढील महिन्यात संघटनात्मक निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पक्षात व्यापक बदल सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हे बदल केवळ संघटनेपुरते मर्यादित न राहता सरकारपर्यंत पोहोचतील, असा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपमधील संघटनात्मक विस्ताराची प्रक्रिया सर्व स्तरांवर राबविण्यास सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. या प्रक्रियेत संघटनेत तरुण नेतृत्व आणि अनुभवी नेत्यांचे प्रमाण साधारण समसमान ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. पुढील सहा महिन्यांत सरकारमध्येही असेच संतुलन दिसून येण्याची शक्यता आहे.

युवा नेते नितीन नबीन यांची कार्यवाहक राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करून पक्ष नेतृत्वाने भविष्यातील वाटचालीसाठी दिशा स्पष्ट केली असल्याचे मानले जात आहे. पुढील दोन दशके विविध पातळ्यांवर पक्षाला पुढे नेऊ शकेल असे नेतृत्व घडवण्याचा पक्षाचा प्रयत्न असून, हे केंद्रातील मोदी सरकारच्या 'व्हिजन २०४७'च्या ध्येयाशी सुसंगत असल्याचे सूत्रांनी सांगितले. सूत्रांच्या माहितीनुसार, १५ जानेवारी रोजी राष्ट्रीय अध्यक्षांची औपचारिक निवड झाल्यानंतर नितीन नवीन यांच्याकडे प्रत्यक्षात पक्षाची जबाबदारी सोपवली जाणार आहे. त्यानंतर फेब्रुवारीच्या मध्यात होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनात या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, संघटनात्मक बदलांबरोबरच केंद्र सरकारमध्येही फेरबदल होण्याचे संकेत मिळत आहेत. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार किंवा पुनर्रचना होऊ शकते, असा विश्लेषकांचा अंदाज आहे.

# अमेरिकेतील मुक्काम अधिकाऱ्यांच्या निर्णयावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : ट्रम्प प्रशासनाने स्थलांतरविषयक नियम अधिक कडक केल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेत जाणाऱ्या प्रवाशांसाठी भारतीय दूतावासाने महत्त्वाची माहिती जारी केली आहे. अमेरिकेत प्रवाशाला किती दिवस राहता येईल, हे व्हिसाच्या वैधतेवर अवलंबून नसून, सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण (सीबीपी) अधिकाऱ्यांकडून ते ठरवले जाते, असे दूतावासाने स्पष्ट केले आहे. भारतीय दूतावासाने समाजमाध्यमांवर दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेत प्रवेशाच्या वेळी सीबीपी अधिकारी परदेशी प्रवाशाच्या मुक्कामाचा कालावधी निश्चित करतात. हा कालावधी व्हिसाच्या समाप्ती तारखेशी थेट संबंधित नसतो. अमेरिकेत किती दिवस राहण्याची परवानगी आहे, हे जाणून घेण्यासाठी प्रवाशांनी आय-९४ फॉर्म तपासावा, असे दूतावासाने सांगितले आहे. या फॉर्ममध्ये अधिकृतपणे मंजूर करण्यात आलेल्या मुक्कामाच्या दिवसांची नोंद असते.

दूतावासाने स्पष्ट केले की सर्व गैर-स्थलांतरित प्रवाशांना आय-९४ फॉर्म लागू आहे. या फॉर्ममध्ये नमूद केलेली अंतिम तारीख ही प्रवाशाला अमेरिकेत राहण्यास परवानगी दिलेल्या कालावधीची असते आणि ती अनेकदा व्हिसाच्या वैधतेपेक्षा वेगळी असू शकते. हवाई किंवा समुद्री मार्गे अमेरिकेत येणाऱ्या प्रवाशांना आय-९४ फॉर्म इलेक्ट्रॉनिक स्वरूपात दिला जातो आणि त्यासाठी स्वतंत्र अर्ज करण्याची गरज नसते. मात्र, जमिनीमार्गे अमेरिकेत प्रवेश करणाऱ्या प्रवाशांना त्यासाठी अर्ज करावा लागतो. इमिग्रेशन व्हिसा असलेल्या प्रवाशांना या प्रक्रियेतून सूट देण्यात आली आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच अफगाणिस्तान, सीरिया यांसह १९ देशांतील प्रवाशांवर निर्बंध लागू केले आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेला जाणाऱ्या भारतीय प्रवाशांनी व्हिसाच्या कालावधीकडे न पाहता आय-९४ फॉर्मवरील मुक्कामाच्या तारखांकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे.

# रामायण, महाभारतात रणनीतीचे धडे

### परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात जागतिक राजकारण, राजनय आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेतील रणनीती यावर सविस्तर भाष्य केले. आपल्या स्पष्ट, अभ्यासपूर्ण आणि परखड मतांसाठी ओळखल्या जाणाऱ्या जयशंकर यांनी यावेळी भारतीय महाकाव्यांमधील पात्रांना जागतिक राजनयाच्या केंद्रस्थानी ठेवत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमात बोलताना त्यांनी भगवान कृष्ण आणि भगवान हनुमान यांना जगातील सर्वात महान राजनयिक असल्याचे म्हटले. महाभारत आणि रामायण या केवळ धार्मिक किंवा पौराणिक कथा नसून त्यामध्ये उत्कृष्ट रणनीती, दूरदृष्टी आणि राजकीय कौशल्य दडलेले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान एका उपस्थिताने विचारले की भारतासाठी एकच जयशंकर पुरेसा आहे की आणखी अशा लोकांची गरज आहे, यावर जयशंकर यांनी हसत आणि मिश्कील शैलीत उत्तर दिले, तुमचा प्रश्नच चुकीचा आहे. यानंतर त्यांनी या प्रश्नाचा संदर्भ स्पष्ट करताना म्हटले, प्रश्न असा असायला हवा की फक्त एकच मोदी का आहेत. कारण देशासाठी खरा फरक निर्माण होतो तो नेत्याच्या दृष्टीमुळे, आत्मविश्वासामुळे आणि निर्णयक्षमतेमुळे. देशांची ओळख त्यांच्या नेत्यांच्या दृष्टीवरून होते. त्या दृष्टीची अंमलबजावणी करणारे अनेक लोक असू शकतात, पण शेवटी दिशा ठरवणारा नेता हाच असतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे पुस्तक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बोलताना जयशंकर यांनी पाश्चात्य लेखकांनी लिहिलेल्या रणनीतीविषयक पुस्तकांवरही परखड टीका केली. ते म्हणाले, बहुतेक रणनीती आणि राजनयावरील पुस्तके पाश्चात्य लोकांनी लिहिलेली आहेत. भारतात रणनीती आणि राज्यकलेची परंपरा नाही, असा समज पसरवला जातो. हे सतत वाचून मला कंटाळा येतो. आपण आपल्या श्रद्धा, संस्कृती आणि परंपरांसह वाढलो आहोत. मात्र, त्या संकल्पनांचे विश्लेषण करण्यासाठी आणि जगासमोर मांडण्यासाठी आपण स्वतःचे शब्द वापरत नाही. त्यामुळे भारताकडेही एक समृद्ध रणनीतीची परंपरा आहे, हे जगाला कळत नाही, असे त्यांनी म्हटले. जयशंकर यांनी महाभारत आणि रामायणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज असल्याचे सांगितले. सामान्यतः आपण या ग्रंथांकडे शक्ती, संघर्ष आणि कुटुंबकथांच्या दृष्टीने पाहतो. पण त्यामधील रणनीती, डावपेच, वाटाघाटी आणि दीर्घकालीन विचारसरणी याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. एकदा मला विचारण्यात आले की तुमच्या मते इतिहासातील सर्वात मोठा राजनयिक कोण आहे. तेव्हा मी भगवान कृष्ण आणि भगवान हनुमान यांची नावे घेतली. भगवान कृष्ण हे महाभारतातील महान राजनयिक होते, तर भगवान हनुमान रामायणातील अतुलनीय राजनयिक आहेत, असे त्यांनी सांगितले. आजचे जग हे युतीच्या राजकारणाचे जग आहे. आज कोणत्याही देशाकडे किंवा गटाकडे पूर्ण बहुमत नाही. कोणतीही युती कायमस्वरूपी प्रभावी राहात नाही. त्यामुळे दररोज नवीन समीकरणे तयार होतात, नवीन करार होतात, बहुध्रुवीय जग हे अनेक पक्षांच्या राजकारणासारखे आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# बांगलादेशातील अस्थिरतेबाबत चिंता व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पाटणा** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि परराष्ट्र व्यवहारांवरील संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष शशी थरूर यांनी शनिवारी बांगलादेशातील प्रचलित "जमावशाही आणि अस्थिरतेबद्दल" तीव्र चिंता व्यक्त केली आणि असा इशारा दिला की, या अशांततेचा बांगलादेश आणि भारत दोघांवरही विपरीत परिणाम होऊ शकतो.

राजगीर येथे रविवारपासून सुरू होणाऱ्या पाच दिवसांच्या नालंदा साहित्य महोत्सवात सहभागी होण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना थरूर म्हणाले की, बांगलादेशातील अराजकता भारतासाठी चांगली नाही. त्यांनी भर दिला की भारताचे हित स्थिर आणि लोकशाही बांगलादेशमुळे चालते आणि शांतता आणि लोकशाही नियमांचे पालन केले पाहिजे. तिथे फेब्रुवारीमध्ये निवडणुकाही होणार आहेत आणि आम्हाला तिथे लोकशाही परत यावी असे वाटते, परंतु तिथे परिस्थिती ज्या पद्धतीने सुरू आहे ती खूप चिंताजनक आहे. अशी परिस्थिती दोन्ही देशांसाठी चांगली नाही; आम्हाला तिथे शांतता हवी आहे, असे ते म्हणाले.

बांगलादेशातील मैमनसिंग जिल्ह्यात २७ वर्षीय हिंदू तरुण दीपू चंद्र दास यांच्यावर झालेल्या जमावाने केलेल्या ईशनिंदेच्या आरोपावरून झालेल्या जमावाच्या हत्येबद्दल थरूर यांनी चिंता व्यक्त केली. अशा घटना रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना जबाबदार धरण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत यावर त्यांनी तेथील अंतरिम सरकारला प्रश्न विचारला. जमावाचे राज्य चालू राहू नये. संसदीय स्थायी समितीने असेही म्हटले आहे की आम्हाला बांगलादेशाशी चांगले संबंध हवे आहेत आणि तेथे शांतता राखली पाहिजे, असे ते म्हणाले. बांगलादेशमध्ये वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर थरूर यांचे हे विधान आले आहे. जमावाचे हल्ले, जाळपोळ आणि हिंसाचारामुळे या प्रदेशातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती आणि लोकशाही शासनाच्या स्थिरतेबद्दल चिंता व्यक्त होत आहे.

### 'पोलिसांनी मुलांवर अत्याचार केला'

**भुवनेश्वर** : एका मध्यमवयीन महिलेने ओडिशा मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली आहे, तिने आरोप केला आहे की जगतसिंगपूर जिल्ह्यात पोलिसांनी तिच्यावर आणि तिच्या अल्पवयीन मुलांवर शारीरिक अत्याचार केले, हा आरोप शनिवारी कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी फेटाळून लावला. जगतसिंगपूर टाउन पोलिस स्टेशन परिसरातील हट्ट बाजार येथील महिलेने असा आरोप केला आहे की, पोलिसांनी तिच्या घरात जबरदस्तीने घुसून तिच्या आणि अल्पवयीन मुलांवर अत्याचार केले.

# सॅन फ्रान्सिस्को शहरात बत्ती गुल

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**सॅन फ्रान्सिस्को** : सॅन फ्रान्सिस्को शहरात शनिवारी झालेल्या मोठ्या वीजबंदीमुळे सुमारे १३०,००० घरं आणि व्यावसायिक ठिकाणे अंधारात गेली. ही वीजबंदी शहरातील रिचमंड, प्रिसिडिओ, सनसेट आणि गोल्डन गेट पार्कसह अनेक भागांवर परिणाम करत होती. वीजबंदीमागचे मुख्य कारण ८ व्या आणि मिशन रोडवरील वीज उपकेंद्रात लागलेली आग असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले, परंतु अद्याप अधिकृत तपास सुरू आहे.

वीजबंदीमुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक ठप्प झाली. तेथील प्रमुख रेल्वे सेवा अंशतः किंवा पूर्णपणे बंद राहिल्या. काही स्थानकांवर प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अधिकारी म्हणाले की, काहीसे पर्यायी मार्ग सुरू करण्यात आले, तरी वेळेवर सेवा देणे कठीण झाले.

वाहतुकीवरही याचा विपरित परिणाम दिसून आला. शहरातील ट्रॅफिक सिग्नल बंद पडल्यामुळे रस्त्यांवर गाड्या गोंधळात अडकल्या. स्वयंचलित वाहनांच्या सेवेवरही प्रभाव पडला आणि कंपनीने सुरक्षा कारणास्तव आपली सेवा तात्पुरती थांबवली.

शहरातील रेस्टॉरंट, दुकाने आणि क्रिसमस सजावट अंधारात राहिल्याने नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला. अग्निशामक दलाने उपकेंद्रातील आगीवर नियंत्रण मिळवले असून, वीज पुरवठा रात्रीपर्यंत पुनर्स्थापित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, परंतु काही भागांमध्ये वीज पुन्हा सुरु होण्याचा अचूक वेळ सांगता आलेला नाही.

नगरपालिकेने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. घराबाहेर न पडण्याचा, प्रमुख उपकरणे बंद ठेवण्याचा आणि सुरक्षिततेचे नियम पाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सॅन फ्रान्सिस्कोतील नागरिकांसाठी ही वीजबंदी मोठा धक्का ठरली आहे, तर प्रशासन व तंत्रज्ञ यंत्रणा वीज पुनर्संचयित करण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे सांगण्यात आले.

### सर्वोच्च न्यायालय व अलाहाबाद उच्च न्यायालयांचे महत्त्वपूर्ण निकाल

# गुन्हे प्रलंबित असताना पासपोर्ट नूतनीकरण शक्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : एखाद्या व्यक्तीविरुद्ध गुन्हेगारी प्रकरण सुरू असले तरी त्याचे मूलभूत हक्क हिरावून घेता येणार नाहीत, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालय आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्णय दिले आहेत. या निकालांमुळे पासपोर्ट नूतनीकरण, परदेश प्रवासाचा हक्क तसेच जामीन अर्ज प्रक्रियेबाबत नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, संबंधित खटल्याच्या न्यायालयाने परवानगी दिली असल्यास केवळ गुन्हेगारी प्रकरण प्रलंबित आहे, या कारणावरून पासपोर्ट नूतनीकरण नाकारता येणार नाही. पासपोर्ट अधिनियमातील कलम ६(२)(फ) ही अट बंधनकारक नसून, प्रत्येक प्रकरणाचा निर्णय परिस्थितीनुसार घ्यावा लागतो, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने सांगितले की परदेश प्रवासाचा हक्क आणि वैयक्तिक स्वातंत्र्य हे संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत संरक्षित मूलभूत हक्क आहेत. त्यामुळे न्यायालयाने घालून दिलेल्या अटींच्या अधीन राहून व्यक्तीला परदेश प्रवासाची मुभा देणे आवश्यक आहे. प्रशासनाने केवळ प्रकरण सुरू आहे, एवढ्याच कारणावर पासपोर्ट नाकारू नये, असा स्पष्ट संदेश या निकालातून देण्यात आला आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने जामीन अर्ज प्रक्रियेबाबत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. प्रकरणात नवीन पुरावे समोर आले असतील किंवा परिस्थितीत लक्षणीय बदल झाला असेल, तर आरोपी थेट उच्च न्यायालयात दुसरा अथवा सलग जामीन अर्ज दाखल करू शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यासाठी प्रथम सत्र न्यायालयात अर्ज करणे आवश्यक नाही, असेही न्यायालयाने नमूद केले. नवीन पुरावे किंवा बदललेल्या परिस्थितीवर आधारित अर्जांचा उच्च न्यायालयाने तातडीने विचार करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. केवळ "प्रकरण सुरू आहे" या कारणावर प्रशासनाने किंवा तपास यंत्रणांनी निर्णय घेणे अयोग्य असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या दोन्ही न्यायालयीन निकालांमुळे नागरिकांचे वैयक्तिक स्वातंत्र्य, मूलभूत हक्क आणि न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता अधिक बळकट झाली आहे. तसेच प्रशासन व पोलीस यंत्रणांना केवळ गुन्हा प्रलंबित असल्याचा आधार घेऊन निर्णय करता येणार नाही, असा ठाम संदेश मिळाला आहे.

कायदा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, हे निकाल भविष्यातील अनेक प्रकरणांसाठी दिशादर्शक ठरणार असून, घटनात्मक मूल्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत.